मंगळवार, ७ मे २०१९ | वर्ष : ५ अंक : १०२ | पृष्ठे १२ | मूल्य : ४.०० रुपये | ★★ पुणे आवृत्ती
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना

# सीबीएसई दहावीच्या परीक्षेत पुण्याच्या विद्यार्थ्यांची बाजी

## सुहानी कोपरे, नमन धर्माणी, ईशा भट्टाचार्य, इशिता जिंतूरकर राज्यात अव्वल

पुणे, दि. ६ (प्रतिनिधी) - केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) जाहीर केलेल्या दहावीच्या परीक्षेच्या निकालात पुण्यातील विद्यार्थ्यांनीही बाजी मारली आहे. डीएव्ही शाळेच्या सुहानी कोपरेने ४९६ गुणांसह राज्यात दुसरी, डीएव्ही शाळेचेच नमन धर्माणी आणि ईशा भट्टाचार्य, इंदिरा नॅशनल स्कूलच्या इशिता जिंतूरकरने ४९५ गुणांसह राज्यात तिसरा क्रमांक मिळवून चमकदार कामगिरी केली आहे. पुण्यातील अनेक शाळांनी शंभर टक्के निकालाची परंपरा राखली आहे.

शहरात लौकिक असलेल्या ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला. परीक्षा दिलेल्या ८० विद्यार्थ्यांपैकी ६१ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले. त्यात स्पृहा सरनाईक ९८.२ टक्के गुणांसह शाळेत पहिली आली. शाळेची गुणांची सरासरी ९२ टक्के आहे. आभा मराठेने ९७.८ टक्के, रेवती दिवेकरने ९७.६ टक्के गुण मिळवले. वानवडीच्या सिटी इंटरनॅशनल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. जान्हवी हृषिकेशने ९७.४ टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. परीक्षा दिलेल्या ८४ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले.

द ऑरबिस प्रशालेचाही १०० टक्के निकाल लागला. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५० टक्के विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले. त्यात कवाना अंकलेकरने ९६.६ टक्के गुणांसह प्रथम, अक्षता वसिष्ठने ९५.२ टक्के गुणांसह दुसरा आणि वृष्टी शहाने ९५.२ टक्के गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला. पिंपरीतील गोयल गंगा इंटरनॅशनल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. आदित्य खानोलकरने ९६.६ टक्के गुणांसह अग्रस्थान मिळवले. ११४ विद्यार्थ्यांपैकी ८२ टक्के विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य श्रेणी आणि ४२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले.

लोकसेवा ई-स्कूलचा १०० टक्के निकाल लागला असून, १८ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत. १८ विद्यार्थ्यांना ८० ते ८५ टक्क्यांच्या दरम्यान गुण मिळाले आहेत. परीक्षेसाठी एकूण ५४ विद्यार्थी बसले होते. एका विद्यार्थीनीला हिंदीमध्ये १०० पैकी १०० गुण मिळाले असून, गणितात ९८, विज्ञानामध्ये ९८, इंग्रजीमध्ये ९६ गुण मिळवून शाळेचे विद्यार्थी प्रथम आले आहेत. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक पायगुडे, संचालिका निवेदिता मडकीकर, प्राचार्या रेणुका दत्ता व संयोजक वैशाली वैष्णव यांनी सर्व गुणवंतांचे अभिनंदन केले आहे.

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे मुख्याध्यापक मिलिंद नाईक म्हणाले, खरेतर ७० टक्के अंतर्गत गुणांची पद्धत अवघड होती. आता २० टक्के अंतर्गत आणि ८० टक्के परीक्षेचे गुण ठेवण्यात आले. त्यामुळे यंदा निकाल कमी होण्याची अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्ष निकाल वाढला आहे. कारण विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षेच्या आधी भरपूर अभ्यास केला असावा आणि पर्यायी प्रश्नांची संख्या वाढल्याने काही प्रश्नपत्रिका सोप्या असण्याचा हा परिणाम असावा.